दैनिक महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : ४ पुणे, गुरूवार, २१ ऑगस्ट २०२५ | पाने : ४ किंमत : ३.००

RNI NO.MAHMAR2022/87390

VOL NO.04. ISSUE : 4 Pune, Thursday, 21 August 2025 | Pages : 4 PRICE : 3.00

# पावसाचा तडाखा...



खडकी : धरण क्षेत्रातील मुसळधार पावसामुळे मूळा नदीला पूर; ऐतिहासिक होळकर पूल पाण्याखाली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये ३४० कुटुंबांचे स्थलांतर!

## अतिवृष्टीमुळे महापालिकेची तातडीची कारवाई, पूरग्रस्तांसाठी निवारा केंद्र सुरू, नदीकाठच्या भागांवर विशेष लक्ष



**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. शहरातून वाहणाऱ्या नद्यांवरील धरणामधून करण्यात येणाऱ्या पाणी विसर्गामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे.

या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून त्या त्या भागातील पूर नियंत्रण परिस्थिती हाताळली जात आहे. महापालिकेने काल (१९ ऑगस्ट २०२५) रात्रीपासूनच पुराने बाधित झालेल्या भागातील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर सुरु केले असून आज सकाळी ८ वाजेपर्यंत शहरातील सुमारे ९५० नागरिकांना निवारा केंद्रांमध्ये तसेच महापालिका शाळांमध्ये स्थलांतरीत केले होते.

या ठिकाणी भोजनासह आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून शहरात विविध ठिकाणी बचावकार्य सुरू आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.

पान ३ वर...

### आयुक्तांकडून पूर परिस्थितीची पाहणी


महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी प्रत्यक्ष पूर परिस्थितीची पाहणी केली. यामध्ये भाटनगर परिसरातील पूरबाधितांना स्थलांतरीत करण्यात आलेल्या कै. नवनाथ दगडू साबळे शाळेला आयुक्त सिंह यांनी भेट दिली. तसेच सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्राथमिक शाळेत स्थलांतरित कुटुंबीय यांची व्यवस्था पाहणी केली. याठिकाणी त्यांनी संबंधित स्थलांतरीत नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची पाहणी केली. तसेच सर्व संबंधित विभागांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

> “ शहरातील पूर परिस्थिती नियंत्रणात आहे. नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे. पाणीपातळीत वाढ होऊन पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते, अशा भागावर महापालिका प्रशासनाकडून विशेष लक्ष ठेवले जात आहे. पुराने बाधित होणाऱ्या नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर केले जात असून तेथे सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांनी महापालिकेच्या नियंत्रण कक्षाला संपर्क करावा.
> – शेखर सिंह,
> आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका









## राजीव गांधी जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली सद्भावना शपथ

**पिंपरी । प्रतिनिधी**

दिवंगत माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त आज पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.



यावेळी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सद्भावना शपथ घेतली आणि सर्व भारतीय जनतेसाठी ऐक्य आणि सामंजस्य राखण्याचा निर्धार केला. शपथ घेऊन सर्वांनी असा निर्णय केला की, जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा यावर आधारित कोणताही भेद न करता लोकांमध्ये सौहार्द वाढवण्यासाठी काम करतील आणि मतभेद आले तरी हिंसा न करता संवाद आणि संविधानिक मार्गाने तो सोडवतील.

महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी मुख्य इमारतीत राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी नगररचना विभागाचे उपसंचालक किशोर गोखले, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उप आयुक्त राजेश आगळे, अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि महापालिकेतील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी एकत्र येऊन जयंतीनिमित्त राष्ट्रभावना आणि एकात्मतेचा संदेश दिला.

## ११२७ नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

शहरात अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूर परिस्थिती मध्ये आज सायंकाळी ५ वाजेपर्यंत विविध बाधित भागातील ३४० कुटुंबातील एकूण १,१२७ नागरिकांना महापालिकेच्या आपत्कालीन यंत्रणेकडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.



आयुक्त सिंह यांनी आज शहरातील पूरग्रस्त भागाला तसेच पूरबाधितांना ठेवण्यात आलेल्या निवारा केंद्राला भेट देऊन तेथील पाहणी केली. त्यावेळी आयुक्त सिंह बोलत होते. यावेळी त्यांनी भाटनगर, पिंपरी येथील कै. नवनाथ दगडू साबळे शाळेत तयार करण्यात आलेल्या निवारा केंद्रास भेट देऊन तेथील वस्तुस्थितीची माहिती घेतली. तसेच जुनी सांगवी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शाळेत स्थलांतरित केलेल्या पूरबाधितांशी संवाद साधत त्यांची विचारपूस केली. यावेळी भाटनगर येथे स्थानिक नागरिकांसह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तर सांगवी येथे माजी महापौर उषा ढोरे, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे, हर्षल ढोरे, शारदा सोनवणे यांच्यासह सहाय्यक आयुक्त उमेश ढाकणे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी तृप्ती सागळे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदी उपस्थित होते.

यानंतर आयुक्त शेखर सिंह यांनी मुळानगर परिसरात वास्तव्यास असलेल्या रहिवासी भागाला भेट देऊन तेथील नागरिकांशी संवाद साधला. तसेच पवना नदीच्या पाणीपातळीचीही पाहणी केली. पावसाचा जोर वाढत असताना तसेच नदीपात्रात धरणातून पाण्याचा विसर्ग वाढण्याच्या सूचना आणि प्रत्यक्ष पाणीपातळी यावर जलद प्रतिसाद पथकांनी बारकाईने लक्ष ठेवावे. पाण्याची धोक्याची पातळी लक्षात घेऊन

पान ३ वर...

## संपादकीय....

# शारीरिक क्षमतेचा अभाव : बेरोजगारीसमोरील नवे संकट

मोबाईलचे व्यसन आणि व्यायामाचा अभावामुळे युवक व युवतींचे शारिरीक स्थुलपणा वाढत आहे. त्याचा परिणाम वजन वाढत आहे. हेच वाढलेले वजन कसे नोकरी मिळविण्यासाठी अडचणीचे ठरते, याची प्रचिती नुकतीच महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाने सरळ सेवेने गट 'ड'च्या भरतीच्या वेळी आली. उमेदवार लेखी परिक्षा उत्तीर्ण झाले पण काहीजण उंचीत तर काहीजणांचे वाढलेल्या वजना मुळे त्यांची नोकरीची संधी हुकली.

बेरोजगारांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. सरकारच्या विविध खात्यात अनेक वर्षांपासून नोकर भरती नाही. एखाद्या विभागात भरती असेल तर हजारोजणांची गर्दी होते. यामध्ये अनेकजण लेखी परिक्षा देऊन उत्तीर्णही होतात. मात्र, शारिरीक चाचणीत वजन व उंचीमुळे नोकरीची संधी हुकते. त्यामुळे पुन्हा प्रयत्न बुद्धीमतेसह शारीरिक क्षमतेवर सुद्धा लक्ष देण्यावर भर देण्याची आवश्यकता असणार आहेत.

काही महिन्यांपूर्वी आरोग्य विभागाने सरळ सेवेने गट 'ड' ची भरती ठेवली होती. आरोग्य विभागाने सरळ सेवा भरतीमध्ये संरक्षण दलात आणि पोलीस खात्यात भरती होण्यासाठी उमेदवारांना लागणारी वजन,उंची आणि छातीची असणारी अट ठेवली होती. त्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता आणि लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊनही अटीमुळे अनेक उमेदवारांना नोकरीची संधी हुकली. तर आरोग्य विभागाने सरळ सेवेने भरणारी गट 'ड' करीता शारिरीक पात्रतेच्या निकषाची अट रद्द करावी,अशी मागणी जिल्हा निवड समितीने पुणे आरोग्य विभागाचे उपसंचालकांना केली आहे. असे असले तरी भविष्यात उमेदवारांना कोणत्याही सरकारी विभागासाठी नोकरी हवी असेल तर अभ्यासासह शारिरीक क्षमतेवर भर द्यावा लागणार आहे.

राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने गट 'ड' संवर्गातील सरळसेवेने रिक्त पदे भरण्याची जाहिरात मागील वर्षी प्रसिद्ध केली होती.राज्यातील ३४ जिल्ह्यासाठी तीन हजार ९१३ पदांची जाहिरात आहे.यापूर्वी आरोग्य विभागातील गट ड च्या जागा १९९१ च्या शासन निर्णयानुसार भरले जात होते.पण सरकारने आरोग्य विभागातील सरळ सेवेने गट ड च्या रिक्त जागा भरताना शारीरिक पात्रतेचे काही अटी टाकून दिले आहे.त्यात पुरुष आणि स्त्री परीचरांसाठी उंची, छाती आणि वजनाची अटींचा समावेश केला आहे. जाहिरातीचा अनुषंगाने हजारों उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज भरून परीक्षा उत्तीर्ण झाले.मागील आठवड्यात जिल्हा निवड समितीने उत्तीर्ण उमेदवारांची कागदपत्रे छाननी आणि मुलाखती पार पडल्या.मात्र अनेक उमेदवारांना विशेषतः महिलांना शारीरिक निकषाच्या अटींमुळे नोकरीवर गदा आली.त्यामुळे जिल्हा निवड समिती आणि नियुक्ती प्राधिकारी यांनी सरळ सेवेने भरणाऱ्या गट 'ड' करीता शारीरिक पात्रतेच्या निकषाची अट रद्द करण्याची शिफारस पुणे विभागाचे उप संचालक डॉ. राधाकिशन पवार यांच्याकडे केली आहे. याशिवाय लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेले आणि शारीरिक पात्रतेत अपात्र ठरलेल्या उमेदवारांची जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून शारीरिक तपासणी करण्याचे सुचविले आहे. उप संचालक डॉ.पवार यांनाही गट ड साठी नव्याने लागू केलेलें शारीरिक पात्रतेच्या निकषाची अट रद्द करण्याची मागणी सह संचालक (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.त्यात जिल्हा निवड समितीने सुचविलेल्या शिफारशी नमूद केले आहे.त्यामुळे आता आरोग्य विभाग यावर काय निर्णय घेते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**नोकरीसाठी वय व वजनाची काय अट**

१८ ते ३८ वर्ष खुल्या गटासाठी तर मागासवर्गीय उमेदवारासाठी ४३ वर्षांची वयाची अट तर पुरूष परिचर साठी उंची ५ फूट ७ इंच छाती ३२ ते ३४ इंच, फुगवून ५ से.मी जास्त वजन ५५ ते ६५ किलो दरम्यान स्त्री परिचर साठी उंची ५ फूट २ इंच वजन ५० ते ६० किलो दरम्यान. होती. मात्र अनेकांची उंची कमी भरली तर अनेकजण वाढलेल्या वजनामुळे नोकरीची संधी हुकली.

आजच्या तरुणाईत मोबाईल, इंटरनेट, टीव्ही आणि संगणकाच्या वापरामुळे बसून राहण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. खेळ, मैदानी उपक्रम, व्यायाम याकडे दुर्लक्ष होत असल्याने लहानपणापासूनच लठ्ठपणा वाढतो आहे. शालेय स्तरावर नियमित खेळ व क्रीडा स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना सक्रिय ठेवले तरच पुढे नोकरीच्या शारीरिक चाचणीत ते पात्र ठरू शकतील. अन्यथा लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊनही शारीरिक क्षमतेत कमी पडल्याने त्यांना संधी नाकारली जाईल, अशी परिस्थिती सतत निर्माण होत राहणार आहे.

याशिवाय बेरोजगारी ही आधीच डोकेदुखी बनली आहे. काही हजार पदांसाठी लाखो उमेदवारांची गर्दी होत आहे. यात मानसिक दडपणाबरोबरच शारीरिक तंदुरुस्तीची स्पर्धा वाढली आहे. ग्रामीण भागातील अनेक युवकांना पोषण आहाराचीही कमतरता असल्याने उंचीचे निकष गाठता येत नाहीत. दुसरीकडे शहरी भागात फास्टफूड आणि व्यायामाचा अभाव यामुळे लठ्ठपणा वाढला आहे. त्यामुळे आरोग्यदायी जीवनशैलीचा अभाव ही बेरोजगारीची एक नवी कारणमीमांसा समोर येत आहे. तज्ज्ञांच्या मते, सरकारने जरी काही पदांसाठी शारीरिक निकष शिथिल केले तरी उमेदवारांनी स्वतः च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरेल. सरकारी नोकरी असो वा खासगी क्षेत्र, दीर्घकाळ काम करण्यासाठी शरीर तंदुरुस्त असणे आवश्यक आहे.



## मापात पाप सुरूच...

# पुणे विभागात वजन मापे पडताळणी व मुद्रांकन शुल्क २५ कोटी ४६ लाख प्राप्त




पुणे विभागात वजमापे पडताळणी व मुद्रांकन शुल्क २५ कोटी ४६ लाख रूपये प्राप्त झाले आहे. वजनमाने व आवेष्टन वस्तू नियम भंग केलेल्या एक हजार ३५० जणांवर खटले दाखल केले आहेत. त्यांच्याकडून प्रशमन शुल्क ८६ लाख २९ हजार रूपये वसुल केल्याची माहिती वैध मापन शास्त्र विभागाचे सहनियंत्रक एस.एच. चाटे यांनी दिली. असे असले तरी अनेक ठिकाणी मापात पाप सुरूच असल्याचे दिसते. अनेक व्यापाऱ्यांनी गेल्या तीन चार वर्षांपासून इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांची पडताळणी व मुद्रांकन न केल्यामुळे ग्राहकांची फवसणूक होत आहे. सकाळच्या दुधापासून ते मद्यापर्यंत, सिलेंडर मधील गॅस पासून ते किराणा मालापर्यंत अनेक वस्तू ग्राहकांना देताना मापात पाप होत असल्याचे दिसून येते. छोट्या व्यापाऱ्यांपासून ते पेट्रोल पंपापर्यंतची तपासणी वैध मापन शास्त्र विभागाने करणे बंधनकारक आहे. दरवर्षी विविध अभियाने राबवून विविध घरगुती वस्तू, पदार्थ मोजणारी यंत्रणा वजन काटे, दुधापासून ते पेट्रोल पर्यंतची मापे, गॅस सिलिंडर ते पंचतारांकीत हॉटेलमधील मद्याच्या मापात पाप करीत असल्याचे दिसून येत आहे. यासह आवेष्टीत वस्तू अधिनियमा अंतर्गत कोणतीही वस्तू व पदार्थ ग्राहकांना अचूक वजनात देणे बंधनकारक आहे. मात्र शहरातील व्यापाऱ्यांकडे असलेल्या वजन काट्यांचे गेल्या तीन ते चार वर्षांत मुद्रांकन व तपासणीच झालेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्राहकांची लूट होत असल्याचे चित्र आहे. हे वजन काटे सराफी बाजारापासून ते साखर कारखान्यातील ऊसाचे वजन करणाऱ्या काट्यांपर्यंत असू शकतात. या वजनांमध्ये फेरफार करता येतो. हे फेरफार होऊ नये, म्हणून वैध मापनशास्त्र विभागाकडून दरवर्षी या वजन काट्यांचे व वजनांचे मुद्रांकन व पडताळणी होत असते. मात्र, ही तपासणारी यंत्रणाच झोपी गेल्यामुळे ग्राहकांची लूट होत आहे. भारत व हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीसह इंडेन कंपनीचे गॅस सिलेंडर वितरक आहेत. वितरक अनेक ठिकाणी होम डिलीव्हरी करतात. मात्र त्यांच्या कर्मचाऱ्यांकडे तोलन उपकरणेच नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे सिलेंडरमध्ये अचूक वजनाचे गॅस असल्याची खात्री देता येत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तर कित्येक ग्राहकांना गॅस सिलेंडर वजन करून घेतले जातात, याची माहितीच नाही. अनेक ठिकाणी महिला यावेळेस गॅस सिलेंडर लवकर संपला अशी तक्रार करतात मात्र त्यांच्या तक्रारीची दखल कोणी घेत नाही. शहरात अनेक ठिकाणी घरगुती सिलेंडरमधून लहान सिलेंडरमध्ये गॅस टाकताना गंभीर अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या घटना अजूनही पुणे व पिंपरी चिंचवड उपनगरात सुरूच आहेत

> **“ पुणे विभागात वजनमापे पडताळणी व मुद्रांकन शुल्क २५ कोटी ४६ लाख रूपये प्राप्त झाले आहेत. तर वजन माने व आवेष्टित वस्तू नियम भंग केलेल्या एक हजार ३५० जणांवर खटले दाखल केलेले आहेत. त्यांच्याकडून प्रशमन शुल्क ८६ लाख २९ हजार रूपये दंड घेतले आहे.**
> **– सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र विभाग, पुणे**

### मापात पाप करणाऱ्यांची तक्रार करा....

**वैधमापनशास्त्र विभागाच्या कायद्याप्रमाणे वजन व मापे, इलेक्ट्रॉनिक वजन काटे तोलन उपकरणांची तपासणी व मुद्रांकन न केल्यास त्यांच्यावर खटला दाखल होऊ शकतो. तसेच वितरकांकडे तोलन यंत्र नसल्यास त्यांच्यावर पाच हजार रूपये दंडाची कारवाई होऊ शकते. मात्र, अनेकांनी ही वजन काट्यांची व तोलन यंत्रांची पडताळणी व मुद्रांकनच करून घेतले नसल्याचे दिसून येते. गॅस सिलेंडर असो वस्तू, पदार्थ, दूध, मद्य किंवा पेट्रोल अचूक मापात व वजनात देणे बंधनकारक आहे. वैधमापन शास्त्र विभागातर्फे विशेष अभियान घेऊन व्यापाऱ्यांकडील व वितरकांकडील वजन काट्यांची, मापांची व तोलन यंत्राची तपासणी केली जाते. वस्तू, पदार्थ, इतर वस्तू मापात व वजन करून न दिल्यास ग्राहकांनी नियंत्रण कक्ष ०२२-२२६२२०२२ व ०२०-२६६६८३१ या दूरध्वनी क्रमाकांवर व लश्राींपिशूरहे.ळप, ऊूलाींपिशूरहे.ळप या मेलवर तक्रारी करण्याचे आवाहान वैधमापन शास्त्र विभागाने केले आहे.**

## शोले सिनेमाची एक कमजोरी उणीव? कामचलाऊ गाणी



कुठलीही कलाकृती आणि त्यातही विशेष करून सिनेमा, सिनेमा ही टीम वर्कने पूर्ण होणारी कलाकृती! त्यामुळे सिनेमा चांगलाच होणार, खूप हीट होणार, यशस्वी होणार, याची खात्री कुणालाच नसते. पण तो तयार करताना आपले शंभर टक्के योगदान द्यायचे, हे प्रत्येकाने स्वतःशीच ठरवायचे असते.

शोले सिनेमा पुढे जाऊन इतका ऐतिहासिक सिनेमा होईल अशी अपेक्षा वा खात्री कुणालाच नव्हती! फक्त निर्माते जी.पी. सिप्पी आणि रमेश सिप्पी यांना सीता और गीताच्या मोठ्या सफलते मुळे, एक भव्य दिव्य सिनेमा 'शोले' च्या रुपाने तयार करावा, एवढी मनिषा होती.

आणि त्यामुळेच सीता और गीताचीच जवळपास सर्व टीम म्हणजे हेमा मालिनी, धर्मेंद्र, संजीव कुमार, संगीतकार राहुल देव बर्मन, गीतकार आनंद बक्षी याही शोलेच्या निर्मीतीत असावी असे ठरले आणि तसेच झाले देखील!

आज शोलेची पन्नाशी झाली. शोले सिनेमा भारतीय सिनेमा क्षेत्रातील ऐतिहासिक सिनेमा ठरला, हा इतिहास सर्वांना माहीत आहे, असं असलं तरी, मला असं पहिल्या पासूनच वाटत आलं आहे, फक्त आज ते सिनेमाच्या पन्नाशीमुळे लिहिण्याचे धाडस करीत आहे. ते म्हणजे शोले सिनेमात सर्व गोष्टी सुंदर रित्या जुळून आल्या असल्या तरी, मला वाटते यातील गाणी आणखी चांगली झाली असती, किंवा गाण्यांच्या शब्दांवर, लिखाणावर म्हणावं तितकं काम करायला वा मेहनत घेतली असती तर, सिनेमाची गाणी सुद्धा क्लासिक झाली असती. जी आज आणि तेंव्हाही गाजली पण ती क्लासिक या सदरात मोडत नाहीत.

कदाचित राहुल देव बर्मन हे या सिनेमाचं टायटल म्युझिक पीस आणि पार्श्वसंगीत बनवण्यात जास्त बिझी असल्याने त्यांनी आनंद बक्षी यांनी जी प्रसंगानुसार गाणी लिहिली ती चपखल बसली म्हणून स्वीकारली असावीत!

जर शोलेची गाणी कुणीही चाली शिवाय म्हटली तर कदाचित त्यांना मी काय म्हणतो हे सहज पटू शकेल. यात आनंद बक्षी यांचा दोष आहे, असं मुळीच नाही. ते खऱ्या अर्थाने व्यवसायिक गीतकार होते. जशी मागणी तसा पुरवठा, काम चलाऊ गाणी हवी तर तशी, एकदम गंभीर, गांभिर्यपूर्वक गाणी हवी (जशी अमर प्रेम मध्ये होती) तर तशीही ते लिहीत!

आता मी म्हणतो म्हणून खालील गाणी चाली शिवाय म्हणून बघा,

**ये दोस्ती हम नहीं तोडेंगे**
**तोडेंगे दम अगर**
**तेरा साथ ना छोडेंगे!**
**खाना पिना साथ है,**
**मरना जिना साथ है!**

किंवा

**टेसनसे गाडी जब छूट जाती है तो**
**एक, दो, तीन हो जाती है!**

किंवा एक सरळ सरळ विधानाचं गाणं झालंय ते म्हणजे

**जबतक है. जान , जान ए जहाँ**
**मै नाचुंगी**

एका ओळीत ध्रुवपद, मुखडा तयार!

पुढे

**प्यार कभी भी मरता नहीं**
**मौतसे भी डरता नहीं**

अशा प्रकारचे रायमिंग आणि शब्दांचा खेळ आनंद बक्षी यांनी बहुतेक गीतलेखनात आयुष्यभर केला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते स्वतः प्रामाणिकपणे म्हणायचे की मै एक फिल्मी गीतकार हूं मै कोई बडा कवी या शायर नहीं हूं

आनंद बक्षी यांची गीत लेखनाची हातोटी विलक्षण होती, त्यामुळेच त्यांनी प्रदीर्घ काळ गीत लेखन केले. बसल्या बसल्या ते दहा मिनिटात गीताचा मुखडा लिहायचे, आणि इतकं सोपं की बास, जणू आपण एकमेकांशी गप्पा मारत बसलो आहोत असे गाणं लिहायचे, वानगीदाखल काही उदाहरणे

**अच्छा तो हम चलते है,**
**फिर कब मिलोगे? ,**
**दिल दिया है जान भी देंगे ऐ वतन**
**तेरे लिये**
**हम जियेंगे और मरेंगे ऐ वतन तेरे लिये!**

(जे गाणं, जे बोल- शब्द प्रणय गीतात तेच देशभक्तीपर गाण्यात टाकून मोकळे झाले)

अशी अनेक गाणी जर आपण चाली शिवाय म्हणून पाहिली तर कदाचित ते गाणंच नाही असे आपल्याला वाटेल. केवळ संगीतकारांनी गुणगुणण्या सारख्या चाली आणि संगीत दिल्या मुळे गाजलेली ही गाणी आहेत हे लक्षात येते! आणि ही गोष्ट फक्त आनंद बक्षी यांची आहे असे नाही, बक्षींसारखे त्या काळी आणि आजही अनेक गीतकार होते आणि आहेत, ज्यांच्या तद्दन गीतांना, शब्दांना संगीतकारांनी संजीवनी दिली आणि त्या काम चलाऊ शब्दांत प्राण ओतले आणि ती गाणी जिवंत केली.

याचा अर्थ असा नाही की आनंद बक्षी चांगले गीतकार नव्हते, ते खऱ्या अर्थाने व्यवसायिक गीतकार होते, त्यामुळे त्यांना माहीत असायचे की कोणता निर्माता, दिग्दर्शक किती पैसे देणार, कोण किती गांभीर्याने सिनेमा बनवतो, त्या नुसार, बक्षी गाण्यावर मेहनत घ्यायचे!

शोलेच्या आधीच सीता और गीता मध्ये त्यांनी पंचम बरोबर अशाच प्रकारची रायमिंग चा शब्द खेळ करणारी गाणी लिहिली होती,

**जिंदगी है खेल**
**कोई पास कोई फेल!**
**ओ बाबू समझे क्या**
**खिलाडी है कोई**
**अनाडी है कोई**
**(फेल, खेल, खिलाडी, अनाडी)**

**अभी तो हाथ में जाम है**
**तौबा कितना काम है!**
**(जाम, काम)**

अशी हां हां म्हणता बक्षी साहेबांनी हजारो गाणी लिहिली! असो आपण पुन्हा शोलेकडे येऊ! तर शोले इतका सुपरडुपर हीट सिनेमा होईल हे माहीत नसल्याने, असेल कदाचित, की बक्षींनी ही गाणी देखील आपल्या नेहमीच्या पद्धतीने सराईत पणे लिहिली, व्यावसायिकपणे! ती अधिक कलात्मकरित्या म्हणजे अमर प्रेम, हिमालय की गोद में, वा जब जब फुल खिले सारखी लिहिली असती तर आणखी दुधात साखरच ! पण असो राहुल देव बर्मन यांनी त्या साध्या सरळ शब्दांनाही जिवंत केले म्हणूनच रसिक आणि कानसेन आजही गुणगुणत असतात,

**ये दोस्ती हम नहीं तोडेंगे**
**तोडेंगे दम मगर,**
**तेरा साथ ना छोडेंगे!**

**- श्रीकांत वाघ, पुणे**
**मोबाइल ९९२३३१६२११**

## वाचकांच्या प्रतिक्रिया

**दै.महा मेट्रो च्या बुधवार दि.२० ऑगस्ट च्या अंकात श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे यांनी 'कवितेत रमणारे बाळकृष्ण गुरुजी' हा लेख लिहिला होता. हा लेख महा मेट्रोच्या अनेक वाचकांच्या पसंतीस उतरला.अनेकांनी या लेखाविषयी महा मेट्रो कडे प्रतिक्रिया नोंदविल्या त्यातील निवडक प्रतिक्रिया देत आहोत.**

खुप अप्रतिम मित्राची आठवण आमच्या शी शेअर केली. यातून का होईना एका चांगल्या बंधूंची, आदर्श शिक्षकांची, उत्तम बालकवीची, उत्कृष्ट लेखकाची ओळख झाली. आणि विशेष म्हणजे एक चांगल्या माणसांशी ऋणानुबंध जुळले हे आजच्या दिवसाचे मला मिळालेले सद्गुण म्हणावे लागेल. माझाही त्यांना नमस्कार सांगा.

**- सौ.स्वाती तोंडे पाटील इंदापूर**

खूप प्रेरक प्रवास लिहिला आहे गुरुजींचा

**-ताज शेख, स्नेहालय संस्था, अहमदनगर**

छान लेख लिहिला आहे. बाचल गुरुजींची धडपड अनेक वर्षे सुरु आहे. त्याचे प्रतिबिंब या लेखात पडले आहे.

**- डॉ दिलीप गरुड सर**

श्री बाळकृष्ण बाचल अत्यंत हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व मी पुणे महापालिकेत शिक्षक असताना आम्ही दोघे स्टाफ मेंबर होतो. त्यामुळे त्यांचं कार्य जवळून पाहिले आहे. बालमनाचा वेध घेणारा प्रसंगी त्यांच्यात रमणारा एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांची खरी ओळख. नवनिर्मितीची कल्पकता व सृजनशील स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. (आपले सातारा पं.स. मधून सेवा निवृत्त झालेले राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक ना. मु बाचल ते आता हयात नाहीत.) यांचे हे धाकटे बंधू. या कुटुंबाचे शिक्षण प्रक्रियेत विशेष योगदान आहे. सध्या आपणांकडे सातारा पं. स. मध्ये कार्यरत असणारे श्री. दत्तात्रय बाचल सर याच परिवारातील. बालकांचे गुणवत्तेसाठी विशेषतः शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षा यासाठी स्वतःचे वेगळेपण जपत कार्यप्रवण असतात. एकूणात या सर्व परिवारास शुभेच्छा!

**- डॉ. पोटघन, सातारा**

खरेच सर एक व्यासंगी शिक्षक. बाचल सरां सोबत काम करता आले हे आपले भाग्य! गरुड सरांनी माझ्या सेवापुर्तीस त्यांना निमंत्रण द्यायला सांगितले होते पण....

सर बोलले आत्ताच बाचल गुरूजींशी. मला खुप विशेष वाटले तुम्हा दोघा मित्रांचे. एक कृष्ण आहे, तर दुसरा सुदामा योगायोगाने किती छान कॉम्बिनेशन जम लंय ना. असा दुर्मिळ योग असतो. असे अनेक अभिप्राय सदर लेखावर आले आहेत. दै. महा मेट्रोच्या वाचकांचे मनः पूर्वक धन्यवाद.

**- श्री. सूरज कुलकर्णी सर, निवृत्त शाळा प्रमुख कर्मवीर भाऊराव पाटील विद्यानिकेतन, येरवडा**

आदरणीय श्री.बाचल गुरुजी मुळचे साताऱ्याचे आहेत. मला अभिमान वाटतो.

**- शिक्षणाधिकारी मा.यशवंतराव**


## यामाहाची महाराष्ट्रातील ग्राहकांसाठी खास ऑफर्स

**मुंबई** : महाराष्ट्रात गणेशोत्सवाचा जल्लोष सर्वत्र साजरा करण्यात येतो. याच निमित्तानं यामाहा मोटर इंडियानं ग्राहकांसाठी खास गणेश चतुर्थी ऑफर्सची घोषणा केली आहे.



यामाहा आपल्या लोकप्रिय १२५लल हायब्रिड स्कूटर श्रेणी आणि मोटरसायकल्सवर आकर्षक फायदे, कमी डाऊन पेमेंट योजना आणि विस्तारित वॉरंटी ऑफर करत आहे. या ऑफर्समुळं यामाहाची स्टायलिश आणि कार्यक्षम दुचाकी खरेदी करण्याची ही उत्तम संधी आहे.



'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे - ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

**पान १ वरून**

### ११२७ नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर

त्या भागातील नागरिकांना ध्वनीक्षेपकाद्वारे पूर्वसूचना देऊन पूरबाधितांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे. कोणत्याही परिस्थितीत अनुचित प्रकार घडणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासनाला दिले आहेत.

दरम्यान, काल रात्री नदीकाठच्या नागरिकांना आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली जलद प्रतिसाद पथकांनी क्षेत्रीय अधिकारी यांच्या अधिपत्याखाली निवारा केंद्रात स्थलांतरित केले. रात्री उशीरापर्यंत स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरू होती. अतिरिक्त आयुक्त यांनी काल रात्री पिंपरी येथील संजय गांधीनगर,सांगवी येथील मुळानगर व कासारवाडी येथील घाट याठिकाणी पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला.अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी बोपखेलमधील नदीकाठच्या रहिवासी भागाची पाहणी करून तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. आवश्यकतेनुसार पूरबाधितांना तात्काळ सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी पिंपरी येथील कमला नेहरू प्राथमिक शाळेमध्ये तसेच फुगेवाडी येथे असलेल्या निवारा केंद्रास भेट देऊन स्थलांतरित करण्यात आलेल्या पूरबाधितांशी संवाद साधला.यावेळी महानगरपालिकेतील विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.याठिकाणी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी जाधववाडी येथील निवारा केंद्रास भेट देऊन पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, आश्विनी गायकवाड, अजिंक्य येळे, अमित पंडित, तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे, पूजा दुधनाळे यांच्या अधिपत्याखाली जलद प्रतिसाद पथके कार्यान्वित करण्यात आली असून आपत्कालीन व्यवस्था हाताळली जात आहे. शिवाय क्षेत्रीय कार्यालयासाठी नेमलेले समन्वय अधिकारी उपायुक्त अण्णा बोदडे, निलेश भदाणे, संदीप खोत यांच्याकडून देखील आपत्कालीन परिस्थितीचे नियंत्रण केले जात आहे. सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल यांच्या अधिपत्याखाली मुख्य नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.





# पिंपरी-चिंचवडमध्ये ३४० कुटुंबांचे स्थलांतर!

**पान १ वरून..**

आयुक्त शेखर सिंह हे स्वत: परिस्थितीवर लक्ष ठेवून असून अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांनी देखील प्रत्यक्ष पूर बाधित भागाला तसेच येथील नागरिकांना स्थलांतरीत केलेल्या स्थळांना भेट देऊन पाहणी केली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने आज सकाळी ८ वाजेपर्यंत 'अ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पुराने बाधित झालेल्या भाटनगर परिसर, पिंपरी येथील सुमारे ७५ नागरिकांना कै. नवनाथ दगडू साबळे शाळा, बुद्धविहार भाटनगर व चेकान दास मेवाणी सभागृह भाटनगर येथे स्थलांतरित केले आहे. 'ब' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या लेबर कॅम्प, किवळे, केशवनगर, जाधव घाट, काळेवाडी परिसरातील ६२८ नागरिकांचे स्थलांतर म्हाडा वेलींग किवळे येथील म्हाडा सदनिका व वाल्हेकरवाडी शाळा येथे करण्यात आले आहे.

'ड' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पुराने बाधित झालेल्या पिंपळे निलख पंचशील नगर परिसरातील ३२ नागरिकांना पिंपळे निलख प्राथमिक विद्यालय क्र. ५२, ५३ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे.

'इ' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या रामनगर बोपखेल भागातील ४५ नागरिकांचे स्थलांतर रामनगर बोपखेल पिंपरी चिंचवड मनपा शाळा येथे करण्यात आले आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील संजय गांधी नगर हा भाग पुराने बाधित झाला असून येथील १२५ नागरिकांचे कमला नेहरू शाळा येथे स्थलांतर करण्यात आले आहे. तर, 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील पूराने बाधित झालेल्या पिंपळे गुरव लक्ष्मीनगर भागातील ४५ नागरिकांना भगतसिंग शाळा, गुलाबनगर, पिंपळे गुरव प्राथमिक विद्यालय क्र. ५४ येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. याशिवाय बांधकामाच्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या काही कामगारांना म्हाडाच्या घरामध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे.

**२४ तास नियंत्रण कक्ष कार्यरत**

**नागरिकांना तातडीने संपर्क करता यावा, यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष २४ तास कार्यरत आहे. या कक्षामधून सी-डॅक, हवामान विभाग यांच्याशी समन्वय ठेवून हवामानाविषयी माहिती वेळोवेळी घेतली जात आहे. वाहतूक पोलिस, सिंचन विभागाशी समन्वय साधून पाण्याच्या विसर्गाची माहिती घेण्यात येत आहे. महापालिकेच्या नियंत्रण कक्षात आपत्ती व्यवस्थापन विभाग, पोलीस बिनतारी यंत्रणा, अग्निशमन विभाग, स्थापत्य विभाग, मलनि:सारण विभाग अशा विविध विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

**नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी केली वाहनांची व्यवस्था**

शहरातील नदीकाठावरील पुराने बाधित होऊ शकणाऱ्या ठिकाणी क्षेत्रीय कार्यालयाकडील तसेच अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग, घनकचरा विभाग यांच्याकडील पथके तैनात करण्यात आलेली आहेत. सदर ठिकाणी अग्निशमन विभागाचे बंब, बोट, रुग्णवाहिका, बाधित नागरिकांचे स्थलांतर करण्यासाठी आवश्यक वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी मदत केंद्रांमध्ये स्थलांतरित करण्यासाठी पीएमपीएमएलच्या बसची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पावसामुळे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे ड्रेनेज चोकअप होणे, रस्त्यावर पाणी साचणे या स्वरूपाच्या तक्रारीच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयामार्फत सदर ठिकाणी टीम पाठवून त्या तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

**जलद प्रतिसाद यंत्रणा तैनात**

पिंपरी चिंचवड शहरात व धरण क्षेत्रामध्ये पावसामुळे मुळशी व पवना धरणातून करण्यात आलेल्या विसर्गामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीची सविस्तर माहिती सातत्याने महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून घेतली जात आहे. महापालिकेकडून पवना, इंद्रायणी व मुळा नदीच्या लगतची वस्ती, सोसायटी व भाग या ठिकाणी सर्व प्रकारच्या उपाययोजना केल्या असून प्रतिसाद यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. महापालिकेच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये मदत केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या ठिकाणी महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयाकडून सर्च अँड रेस्क्यू टीम्स उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. त्याचप्रमाणे नजीकच्या ठिकाणी मदत केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. या ठिकाणी पाण्याची व्यवस्था, विजेची व्यवस्था व त्याप्रमाणे आवश्यक आरोग्याची व्यवस्था करून देण्यात आली आहे. विविध माध्यमांद्वारे नागरिकांना वेळोवेळी पूर परिस्थिती, अतिवृष्टी, धरणातील विसर्ग याबाबत सूचना देण्यात येत आहेत.

# पुण्याला मुसळधार पावसानं झोडपलं

## खडकवासला धरणातून वाढलेला विसर्ग, सिंहगड रोड परिसरात पूरसदृश परिस्थिती

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे आणि परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मागील काही दिवसांपासून घाटमाथ्यावर तसेच पुणे शहरात पावसाचा जोर वाढला असून, खडकवासला धरण क्षेत्रातील जलसाठा झपाट्याने वाढला आहे. परिणामी धरण प्रशासनाने पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढवला आहे. मंगळवारी रात्री तब्बल ३५ हजार क्यूसेक इतक्या वेगाने पाणी सोडण्यात आल्यानं पुणे शहरातील मुठा नदीच्या काठावरील भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून, नदीकाठच्या भागातील लोकांना तातडीने सुरक्षित स्थळी हलवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




सिंहगड रोड परिसर या पावसामुळे सर्वाधिक प्रभावित झाला आहे. भिडे पूल पाण्याखाली गेल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. विशेषत: एकतानगरी परिसरातील अनेक सोसायट्यांमध्ये पावसाचे पाणी शिरले असून, नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. पाणी घरामध्ये शिरल्यामुळे रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात येत आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाने सांगितले आहे की, पुढील काही तासांमध्ये अजूनही पावसाचा जोर कायम राहू शकतो. त्यामुळे नागरिकांनी अनावश्यक बाहेर पडू नये, सुरक्षित ठिकाणीच थांबावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मागील वर्षी देखील सिंहगड रोड परिसरात अशाच प्रकारे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या भागाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला होता. त्यावेळी त्यांनी नागरिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी सुरक्षा भिंत उभारण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, एक वर्ष उलटून गेल्यानंतरदेखील प्रत्यक्षात कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. प्रशासनाकडून झालेल्या दिरंगाईमुळे पुन्हा एकदा त्याच समस्या उभ्या राहिल्या आहेत.

महापालिका प्रशासन, अग्निशमन दल आणि आपत्कालीन यंत्रणा मंगळवार रात्रीपासून कार्यरत असून, बचावकार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पाण्याचा विसर्ग वाढल्याने नदीपात्रातील पाणी झपाट्याने वाढत आहे. यामुळे मुठा नदीलगतच्या परिसरात पूरस्थिती गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महापालिका अधिकाऱ्यांनी नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठी तातडीने मोहीम हाती घेतली असून, अनेक कुटुंबांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे.

# गहाळ व चोरीस गेलेले तब्बल ८ लाखांचे १२ मोबाईल फोन हस्तगत

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे शहरातील समर्थ पोलीस ठाण्याच्या दक्ष कारवाईमुळे गहाळ व सायबर गुन्ह्यात चोरीस गेलेले तब्बल ८,००,००० रुपयांचे १२ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले आहेत. केंद्र शासनाच्या सी.ई.आय.आर या अत्याधुनिक प्रणालीचा वापर करून ही कारवाई करण्यात आली.




समर्थ पोलीस ठाण्यातील गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. चेतन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार सुवर्णा जाधव, अविनाश दरवडे, सुनिता खोमणे यांनी या प्रकरणाचा तपास हाती घेतला. या पथकाने गहाळ मोबाईल्सचा डेटा तयार करून तांत्रिक तपास व सततचा पाठपुरावा केला. त्यातून हरविलेले व चोरीस गेलेले मोबाईल फोन महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत तसेच राज्याबाहेरील प्रदेशांमध्ये वापरले जात असल्याचे निदर्शनास आले.

त्याचबरोबर संबंधित पोलीस ठाण्यांशी पत्रव्यवहार करून आणि संवाद साधून मोबाईल्स शोधून काढले. या प्रयत्नांमुळे एकूण १२ मोबाईल फोन - ज्यात ६ ॲपल कंपनीचे आयफोन व ६ इतर कंपन्यांचे मोबाईल फोन - यशस्वीरित्या हस्तगत करण्यात आले. हस्तगत केलेल्या मोबाईल फोनची एकत्रित किंमत अंदाजे ८ लाख रुपये इतकी आहे.

ही यशस्वी कारवाई पुणे शहराचे मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. राजेश बनसोडे, मा. पोलीस उप-आयुक्त (परी. ०१) श्री. कृषिकेश रावले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.




# घरफोडी करून महागडे जाग्वार कंपनीचे प्लंबिंग साहित्य चोरट्याला पर्वती पोलिसांनी जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

पर्वती पोलीस ठाण्याच्या दक्ष कारवाईमुळे रात्रीच्या वेळी दुकानफोडी करून महागडे जाग्वार कंपनीचे प्लंबिंग साहित्य, इन्व्हर्टर बॅटरी व रोख रक्कम चोरणाऱ्या आरोपीला अखेर अटक करण्यात यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ९२,८००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी रात्रीच्या वेळी पर्वती पोलीस स्टेशन हद्दीतील भाग्यलक्ष्मी हार्डवेअर, प्लॉट क्र. ५, मित्र मंडळ कॉलनी, पर्वती दर्शन, पुणे-०९ येथील दुकानामध्ये अज्ञात चोरट्याने घरफोडी करून प्रवेश केला. त्याने दुकानातून जाग्वार कंपनीचे महागडे प्लंबिंग साहित्य, इन्व्हर्टर बॅटरी व रोख रक्कम असा एकूण १,०७,६००/- किंमतीचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून पर्वती पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५१/२०२५, भा.दं.वि. कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार गायकवाड व गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक श्रीमती अनिता हिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्री. किरण पवार यांनी सुरू केला. तपासादरम्यान पोलीस अंमलदार महेश मंडलिक यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की हा गुन्हा अक्षय शंकर कांबळे (वय २५, रा. मिरेकर वस्ती, वैदुवाडी, हडपसर, पुणे) या आरोपीने केला आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी हडपसर भागात सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी तब्बल ९२,८००/- किंमतीचा साहित्य हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळाले. उर्वरित मुद्देमाल शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

# आठ महिन्यांपासून पोलिसांना चकवा देणारा सुटला अखेर सापळ्यात



**धनकवडी । प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने खुनाच्या प्रयत्नातील आठ महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीस जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. गु.र.नं. ४२/२०२५, भा.न्या.सं. क. १०९ तसेच आर्म ॲक्ट कलम ३(२५) अंतर्गत दाखल गुन्ह्यातील आरोपी करण भारत गजरमल (वय १९ वर्षे, रा. दभाडी, आंबेगाव बु., पुणे) हा बराच काळ पोलिसांच्या शोधापासून बचावत होता.

तपास पथकातील पोलीस उप-निरीक्षक निलेश मोकाशी व पोलीस अंमलदार मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे हे सातत्याने आरोपीच्या शोधात असताना त्याच्या हालचालींबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. खबर मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करून १९ ऑगस्ट २०२५ रोजी त्यास अटक केली. या कारवाईत मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग राजेश बनसोडे, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ २ मिलींद मोहीते, तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) जितेंद्र कदम यांच्या देखरेखीखालील पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. या यशस्वी कारवाईत पोलीस कर्मचारी सचिन सरपाले, महेश बारवकर, मंगेश पवार, निलेश खैरमोडे, मंगेश गायकवाड, किरण साबळे व संदीप आगळे यांचाही सक्रिय सहभाग होता.

# एमकेसीएलचा रौप्य महोत्सव जल्लोषात साजरा

## माहिती-तंत्रज्ञानाचा लोकशाहीकरणाचा यशस्वी प्रवास

**पुणे : प्रतिनधी**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल)चा रौप्य महोत्सवी स्थापना दिन समारंभ २० ऑगस्ट रोजी पुण्यातील बंटारा भवन येथे मोठ्या उत्साहात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, माजी विधानसभा अध्यक्ष आ. दिलीप वळसे पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, एमकेसीएल चे चीफ मेंटॉर डॉ. विवेक सावंत, माजी कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, कुलगुरू डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, डॉ.अनंत सरदेशमुख, डॉ.सी.डी.मायी,डॉ. आर. बी. देशमुख, एमकेसीएल चे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे, वीणा कामथ, उदय पंचपोर,




श्रीमती कोमल चौबळ यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. ज्येष्ठ अणू शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी अध्यक्षस्थान भूषवले.

प्रमुख पाहुणे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,' राज्यातील डिजिटल दरी कमी करण्याचे काम एम के सी एल ने केले. बदलांना अनुकुल सक्षम मनुष्यबळ निर्माण केले. सामाजिक परिणामांना तयार सक्षम केले. माहिती-तंत्रज्ञान क्रांतीचे लोकशाहीकरण केले. त्यामागे डॉ.विवेक सावंत यांचे द्रष्टे प्रयत्न कारणीभूत ठरले.दिलीप वळसे पाटील यांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. शेवटच्या माणसापर्यंत पोचणारी यंत्रणा निर्माण झाली.डेटा मुळे समृद्धी, संपत्ती होत असताना नव्या जगाची आव्हाने पेलावीत.

दिवसभर चार सत्रांत मान्यवरांची उपस्थिती, प्सचे अनावरण, ग्रंथ प्रकाशन आणि प्रेरणादायी भाषणे यामुळे हा रौप्य महोत्सव सोहळा संस्मरणीय ठरला. सूत्रसंचालन डॉ. रेवती नामजोशी यांनी केले. रौप्य महोत्सवी स्थापना दिन सोहळा हा एमकेसीएलच्या वाटचालीतील केवळ एक टप्पा नसून शिक्षण, तंत्रज्ञान आणि सामाजिक परिवर्तन यांचा संगम घडविणारा प्रेरणादायी सोहळा ठरला. सकाळी ११ वाजता पहिल्या सत्रात एमकेसीएलचे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांनी प्रास्ताविक केले. चीफ मेंटॉर विवेक सावंत यांनी एमकेसीएलच्या २५ वर्षातील कार्याचा मागोवा घेत भावी वाटचालीची माहिती दिली. माजी विधानसभा अध्यक्ष आ. दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते 'एमकेसीएल: संस्था आणि संस्थापक' या ग्रंथाचे प्रकाशन झाले. डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते 'इंडियन आर्ट इन द डिजिटल वर्ल्ड' या ग्रंथाचे अनावरण करण्यात आले.२५० नवीन डिजिटल रोजगारसक्षम अभ्यासक्रमचे चे अनावरण यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ चे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते झाले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ चे कुलगुरू डॉ.व्ही.एल.माहेश्वरी यांनी मार्गदर्शन केले.'सायबर रक्षक' चे अनावरण मराठा चेंबर ऑफ कॉमर्स चे माजी महासंचालक डॉ. अनंत सरदेशमुख यांच्याहस्ते झाले. डॉ.अनिल काकोडकर यांच्या भाषणांचे संकलन असलेल्या 'एज्युकेशन टुमारो ' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ.सी.डी.मायी यांची हस्ते झाले.पमास्टर या पचे अनावरण माजी कुलगुरू डॉ.आर.बी.देशमुख यांच्या हस्ते झाले.

## महत्वाचे...

### कुडजे येथे घरफोडी; ९० हजारांचे दागिने लंपास

**पुणे : प्रतिनिधी**

हवेली तालुक्यातील कुडजे गावात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून तब्बल ९० हजार रुपयांचे सोने-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. ही घटना १८ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता ते १९ ऑगस्ट रोजी पहाटे ५ वाजेदरम्यान घडली. फिर्यादी (वय ४३, रा. कुडजे) हे घराला कुलूप लावून बाहेर गेले असताना अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप उचकटून आत प्रवेश केला. त्यानंतर स्वयंपाकघरातील कपाट फोडून अंदाजे ९० हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी उत्तमनगर पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३०५, ३३१ (५), ३३१ (४) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक फिरोज मुलाणी अधिक तपास करीत आहेत.

### नन्हे येथे घरफोडी; १ लाखांचा ऐवज लंपास

**पुणे : प्रतिनिधी**

सिंहगड रोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत नन्हे येथील मोकारवाडी परिसरात अज्ञात चोरट्याने फ्लॅट फोडून सुमारे १ लाख रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना १२ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५.३० ते १९ ऑगस्ट रोजी पहाटे २ वाजेदरम्यान घडली. फिर्यादी (वय २५, रा. नन्हे) हे फ्लॅटला कुलूप लावून बाहेर गेले असताना, अज्ञात चोरट्याने मुख्य दरवाजाचे कुलूप उचकटून आत प्रवेश केला. घरातील दोन मोबाईल फोन, एक लॅपटॉप आणि टीव्ही असा एकूण सुमारे १,००,००० रुपयांचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी सिंहगड रोड पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३३१ (४), ३३१ (५), ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### बीएमसीसी रोडवरून २.१८ लाखांची कॉपर वायर चोरी

**पुणे : प्रतिनिधी**

शिवाजीनगर येथील बीएमसीसी रोडवरील एनसीसी मैदानाजवळील बांधकाम साईटवरून अज्ञात चोरट्याने तब्बल २ लाख १८ हजार ४०० रुपयांची कॉपर वायर चोरल्याची घटना घडली आहे. हा प्रकार १८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी साडेचार वाजता उघडकीस आला. फिर्यादी (वय ४६, रा. कात्रज) हे बांधकाम साईटवर काम करत असताना अज्ञात इसमाने साईटवर ठेवलेल्या कॉपर वायरवर डल्ला मारला. आरोपीने वायर चोरून नेल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### पिसोळीत ५.३५ लाखांची ऑनलाईन फसवणूक

**पुणे : प्रतिनिधी**

हडपसर उपनगरातील पिसोळी परिसरात ६६ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची ५ लाख ३५ हजार २०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना १३ जून ते १९ जून २०२५ या कालावधीत घडली. फिर्यादी यांना अज्ञात मोबाईल धारकाने फोन करून स्वतः ला बँकेतून बोलत असल्याचे सांगितले. त्यानंतर फोन पे सुरु करण्याच्या बहाण्याने त्यांचा विश्वास संपादन केला. आरोपीने फिर्यादींकडून गोपनीय माहिती घेत, त्यांची तब्बल ५,३५,२०० रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी काळेपडळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विठ्ठलवाडीतील भीमा नदीवरील पूल पाण्याखाली

## शिरुरसह हवेली व दौंड या तीन तालुक्यांचा संपर्क तुटला



**पुणे । प्रतिनिधी**

गेली दोन दिवस सुरू असलेल्या संततधर व मुसळधार पावसामुळे भीमा नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाल्याने भीमा नदीवरील खेड, शिरूर, हवेली, दौंड या चार तालुक्यातील तब्बल अठरा बंधारे काल पासून दुथडी भरून वाहत असताना शिरूर तालुक्यातील विठ्ठलवाडी येथील बंधारा पाण्याखाली गेल्याने तीन तालुक्यांचा संपर्क तुटला आहे.

विठ्ठलवाडी (ता. शिरूर) येथील भीमा नदीवरील बंधारा यापूर्वी जड वाहतुकीसाठी बंद करण्यात आलेला असताना नुकतेच भीमा नदीला आलेल्या पुरामुळे विठ्ठलवाडी ते सांगवी सांडस दरम्यानचा भीमा नदीवरील बंधारा पाण्याखाली गेल्याने येथील जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर दौंड, हवेली, शिरूर तालुक्यातील नदीकाठच्या काही गावांचा संपर्क तुटला आहे.

भामा आसखेड व चासकमान धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस अद्यापही सुरू असताना दोन्ही धरणे पूर्ण क्षमतेने भरत आल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग भीमा नदीत होत आहे. तसेच इंद्रायणी नदीचा विसर्ग या नदीत होत असल्याने पुन्हा भीमा नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाल्याने खेड, हवेली, शिरूर, दौंड तालुक्यातील १८ बंधारे पाण्याखाली गेले आहेत. चासकमान धरणातून तसेच भामा आसखेड धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग काल सायंकाळपासून करण्यात आलेला असल्याने भीमा नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा पाटबंधारे विभागाने दिला आहे. धरण क्षेत्र व चासकमान धरण परिसरातही अद्याप पाऊस चालू असल्याने कधीही पाणी वाढेल. बंधाऱ्यावरून पाणी वाहत असल्याने कोणीही बंधारा ओलांडू नये. वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांसाठी हा रस्ता पूर्णतः बंद करण्यात आलेला असून नागरिकांना काल पासून सतर्कततेचे आवाहन करण्यात आले.

# बस प्रवासात अनोळखी महिलेचा धक्का; वृद्ध महिलेची सोन्याची बांगडी लंपास

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी परिमंडळ ५ च्या पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. परिमंडळ ५ मधील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील एकूण १० सराईत गुन्हेगारांना दोन वर्षांसाठी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण हद्दीतून तडीपार करण्यात आले आहे.

या कारवाईत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत ७ आणि कलम ५६ अंतर्गत ३ गुन्हेगारांवर तडीपाराची कारवाई झाली आहे. यामध्ये लोणी काळभोर, कोंढवा आणि वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुख्यात गुन्हेगारांचा समावेश आहे.

लोणी काळभोर येथील अनिकेत यादव व प्रसाद सोनवणे यांच्यासह बेकायदेशीर हत्यारे बाळगणे, दरोडे, जबरी चोरीसारख्या गुन्ह्यांमध्ये सामील असलेले आरोपी आहेत. तर कोंढव्यातील विश्वजीत गायकवाड तसेच करीम सय्यदअली सौदागर उर्फ लाला याच्या टोळीतील शाहरुख पठाण, अझहर शेख व अझहर उर्फ अज्जु यांच्यावर कारवाई झाली आहे. यांच्यावर हत्यारे बाळगणे, मारहाण, चोरी, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान यांसारखे सात गुन्हे दाखल आहेत. तसेच वानवडीतील राहुल उर्फ विकी परदेशी व त्याच्या टोळीतील विशाल सोनकर व सुनिल परदेशी यांच्यावरही तडीपार कारवाई करण्यात आली आहे.

या कारवाईबाबत परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की,

गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासून परावृत्त करण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ही कारवाई करण्यात आली आहे. सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर पोलिसांचे बारकाईने लक्ष आहे. नागरिकांनी तडीपार आरोपी हद्दीत दिसल्यास त्वरित पोलीस नियंत्रण कक्ष ११२ किंवा जवळील पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. परिमंडळ ५ च्या पोलिसांनी जानेवारी २०२५ पासून आजपर्यंत ११४ सराईत गुन्हेगारांवर कारवाई केली आहे. यामध्ये १६ जणांवर एमपीडीए, ६७ जणांना मोका अंतर्गत जेरबंद, तर ३१ जणांना तडीपार करण्यात आले आहे.

# अव्यवसायिक वाहनांसाठी वार्षिक टोल (फास्टॅग) पासची सवलत

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हयातील खेडशिवापूर टोल प्लाझा, पाटस टोल प्लाझा, सरडेवाडी टोल प्लाझा व चालकवाडी टोल प्लाझा वर अव्यवसायिक (कार/जीप/व्हॅन) वाहनांसाठी, प्रवाशांसाठी वार्षिक टोल (फास्टॅग) पास सुरू होत असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे. ही योजना फक्त अव्यवसायिक (कार/जीप/व्हॅन) वाहनांसाठी व प्रवाशांसाठी असणार आहे.

वार्षिक टोल (फास्टॅग) पासची वैधता १ वर्ष किंवा २०० एकेरी वाहनांच्या फेऱ्यांसाठी यापैकी जे आधी होईल ते लागू राहील. फक्त राष्ट्रीय महामार्ग व राष्ट्रीय दुतगती महामार्गावरील टोल प्लाझांसाठी वैध असून, वार्षिक टोल (फास्टॅग) पासची किंमत फक्त तीन हजार रुपये इतकी राहील. वार्षिक टोल पास (फास्टॅग) मिळविण्यासाठी तसेच सक्रियता आणि नूतनीकरणासाठी राजमार्ग यात्रा मोबाईल ॲपवर तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी १०३३ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असेही प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांना प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# पुणे काँग्रेसकडून राजीव गांधींना अभिवादन

## काँग्रेस भवनात आदरांजली, त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांची आठवण




**पुणे । प्रतिनिधी**

भारतरत्न, माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंती दिनानिमित्त पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेस भवनात भावपूर्ण अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे खजिनदार ड. अभय छाजेड आणि माजी नगरसेवक अजित दरेकर यांनी स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली.

यावेळी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ता गोपाळ तिवारी, कमल व्यावहारे, अविनाश साळवे, राज अंबिके, प्राची दुधाने, अनुसया गायकवाड, सुरेश नांगरे, दिलीप लोळगे, अविनाश अडसूळ, देवीदास लोणकर, कृष्णा सोनकांबळे, फैय्याज शेख, मनोहर गाडेकर, राज घेलोत, भास्कर कांबळे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

राजीव गांधी यांच्या कार्याचे स्मरण करत उपस्थितांनी देशाच्या आधुनिकतेसाठी त्यांच्या योगदानाचा गौरव केला. माहिती तंत्रज्ञान, तरुणांना राजकारणात संधी आणि पंचायतराज संस्थांच्या सबलीकरणासंदर्भातील त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांची आठवण करून देत, त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प काँग्रेसने या निमित्ताने व्यक्त केला.

# बिबवेवाडीत ४.३६ लाखांची ऑनलाईन फसवणूक



**पुणे । प्रतिनिधी**

बिबवेवाडी परिसरात एका ६९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल ४ लाख ३६ हजार ५०० रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना ७ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट २०२५ दरम्यान घडली.

फिर्यादींना एका मोबाईल धारकाने बँकेतून बोलत असल्याचे सांगून विश्वासात घेतले. त्यानंतर आरोपीने फिर्यादींच्या मोबाईलवर एक पक फाईल पाठवली. त्यामध्ये वैयक्तिक माहिती भरण्यास प्रवृत्त करून आरोपीने त्यांची आर्थिक फसवणूक केली. या प्रकारात फिर्यादींचे तब्बल ४,३६,५०० रुपये गमावले.

या प्रकरणी बिबवेवाडी पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३१८ (४), ३१९ (२), ३ (५) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक (गुन्हे) बेंद्रे पुढील तपास करीत आहेत.

# पावसामुळे उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे : आयुक्त

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरणाच्या पाणलोट क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. हवामान विभागाकडून पुणे जिल्ह्यासाठी आज रेड अलर्ट देण्यात आला असून पुणे जिल्हा व घाट परिसरात पुढील तीन तासात ४० ते ६० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शिवाय पिंपरी चिंचवड शहरातून वाहणार्या नद्यांवरील धरणामधून करण्यात येणार्या विसर्गामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर नदीकाठ परिसरातील नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे. पावसामुळे उद्भवणारी आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहण्याचे निर्देश देखील आयुक्त सिंह यांनी प्रशासकीय यंत्रणांना दिले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून शहर परिसरात पावसाची संततधार सुरू आहे. शहरातून वाहणार्या पवना, मुळा आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत असून यामध्ये धरणातून विसर्ग देखील केला जात आहे. विशेषत: पवना धरण जवळपास ९७ टक्के भरले आहे. या धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस पडत असून धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग केला जात आहे. आज सकाळी ९ वाजता सुमारे ५ हजार ६६० क्युसेक इतका विसर्ग या धरणातून पवना नदीपात्रात करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार आणि येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणार्या विसर्गाचे प्रमाण अवलंबुन असल्याचे पवना धरण पूर नियंत्रण कक्षाच्या वतीने सांगण्यात आले आहे. यासर्व बाबी विचारात घेता महापालिकेच्या सर्व यंत्रणांनी दक्ष राहण्याचे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

नदीकाठच्या नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करावे लागल्यास त्याठिकाणी भोजन, वैद्यकीयसह सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी, क्षेत्रीय कार्यालयांमार्फत जलद प्रतिसाद पथकाने दिवसरात्र नदीकाठ परिसरावर लक्ष ठेवावे, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांशी समन्वय साधून

### वडगावशेरीतील ज्येष्ठाची १.५७ कोटींची ऑनलाईन फसवणूक

**पुणे : प्रतिनिधी**

शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीच्या आमिषाने वडगावशेरी परिसरातील ६५ वर्षीय नागरिकाची तब्बल १ कोटी ५७ लाख २७ हजार ८४८ रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार १७ मार्च ते २९ मे २०२५ दरम्यान घडला. फिर्यादींना अज्ञात मोबाईल धारकाने संपर्क साधून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगितले. त्यांचा विश्वास संपादन करून मोठ्या रकमांची गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. मात्र त्यातून काहीही परतावा न मिळता आरोपीने तब्बल १.५७ कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३१९ (२), ३१८ (४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# रवि परांजपे चित्रकलेचे हस्तांतरण

**पुणे । प्रतिनिधी**

दिवंगत चित्रकार रवी परांजपे यांच्या १३९ कलाकृती महाराष्ट्र शासनाकडे सुपूर्त करण्याची प्रक्रिया संपन्न झाली. या कलाकृतींमध्ये ७२ मूळ पेंटिंग्ज आणि ६७ फ्रेम आर्ट वर्क समाविष्ट आहेत. या कलाकृती सुपूर्त करण्याची इच्छा दिवंगत रवी परांजपे यांच्या पत्नी, मा. स्मिताताई परांजपे यांनी व्यक्त केली होती. त्यानुसार, दि. २६ जून २०२३ रोजी या कलाकृती जहांगिर आर्ट गॅलरीमध्ये आयोजित कार्यक्रमानंतर पुरातत्त्व संचालनालयाच्या ताब्यात दिल्या होत्या. तथापि, अधिकृत सामंजस्य करारासाठी शासनाची मान्यता अपेक्षित होती.

महाराष्ट्र शासनाने मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य ॲड आशिष शेलार यांच्या पुढाकारामुळे दि. १७.०६.२०२५ रोजी शासन निर्णयाद्वारे कलाकृती स्विकारण्यास मान्यता दिली. त्यानुसार सर्व शासकीय सोपस्कार पार पडल्यानंतर ॲड आशिष शेलार यांनी मा. स्मिताताई परांजपे यांच्या मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे येथील निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत प्रत्यक्ष सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. सदर कलाकृती सध्या सातारा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात तात्पुरत्या स्वरुपात प्रदर्शित केल्या आहेत. भविष्यात या चित्रकृती राज्यभरातील विविध संग्रहालयांमध्ये जनसामान्यांसाठी प्रदर्शित केल्या जाणार आहेत. या कलाकृतींपासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, कलेचे आणि व्यावसायिकतेचे धडे मिळतील, अशी अपेक्षा आहे. या कलाकृतींपैकी मोठा भाग मुंबई येथील नियोजित महाराष्ट्र राज्य वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केला जाणार आहे. करारनाम्यावर पुरातत्त्व विभागाच्या वतीने उप संचालक श्री. हेमंत दळवी यांनी स्वाक्षरी केली.

### बस प्रवासादरम्यान १.१० लाखांची सोन्याची बांगडी चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

वारजे माळवाडी परिसरात बस प्रवासादरम्यान एका महिलेला सोन्याच्या बांगडी चोरीचा फटका बसल्याची घटना उघडकीस आली आहे.

ही घटना १४ ऑगस्ट रोजी दुपारी १.४५ ते ३ वाजेदरम्यान पुणे मनपा ते जिजाई गार्डन वारजे या पीएमपीएमएल बस प्रवासादरम्यान घडली. फिर्यादी महिला (वय ६०, रा. वारजे माळवाडी) या बसने प्रवास करत असताना बसमधील गर्दीचा फायदा घेत एका अनोळखी महिलेनं त्यांना धक्का दिला. त्या गोंधळात फिर्यादींच्या हातातील तब्बल १ लाख १० हजार रुपये किंमतीची सोन्याची बांगडी चोरून नेण्यात आली. या प्रकरणी वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नाट्य परिषदेचा २९ वा वर्धापनदिन; नामांकित कलाकारांचा सन्मान सोहळा २३ ऑगस्ट रोजी

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण; स्पृहा जोशी, प्रवीण तरडे, संकर्षण कऱ्हाडे यांसह दिग्गजांचा गौरव

**चिंचवड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी-चिंचवड शाखेला यावर्षी ९ ऑगस्ट रोजी २९ वर्षे पूर्ण झाली असून, वर्धापन दिन सोहळा दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी भव्यदिव्य पद्धतीने साजरा करण्यात येणार आहे. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे सायं. ५ वाजता होणाऱ्या या समारंभात नाट्यसृष्टीतील मान्यवरांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भाऊसाहेब भोईर म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शाखेच्या वतीने शहरात सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाते. या उपक्रमांमुळे शहराच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर पडली आहे. यापूर्वी दोन नाट्य संमेलनांचे यशस्वी आयोजन शाखेने केले असून, यामुळे पिंपरी-चिंचवड शहराचा नावलौकिक वाढविण्यात मोठी भूमिका पार पाडली आहे. यावर्षीच्या वर्धापनदिन सोहळ्यास उपमुख्यमंत्री मा. अजित पवार यांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे मुंबई येथील विश्वस्त अशोक हांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**मान्यवरांचा गौरव**

विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कलावंतांना नामांकित पुरस्कार देण्यात येणार आहेत. ज्येष्ठ नाट्यसंगीतकार ज्ञानेश पेंढारकर यांना 'कै. बालगंधर्व पुरस्कार', अभिनेता, कवी, लेखक, निवेदक संकर्षण कऱ्हाडे यांना 'आचार्य प्र. के. अत्रे पुरस्कार', अभिनेता, लेखक व दिग्दर्शक प्रवीण तरडे यांना 'कै. अरुण सरनाईक पुरस्कार', कवयित्री व अभिनेत्री स्पृहा जोशी यांना 'कै. स्मिता पाटील पुरस्कार' आणि नाट्य-सिने-मालिका लेखक अरविंद जगताप यांना 'कै. जयवंत दळवी पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत.

याशिवाय, शहराचे भूषण असलेल्या पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त तसेच ज्येष्ठ शास्त्रीय गायक पं. सुरेश साखवळकर यांना नाट्य परिषदेच्या मध्यवर्ती संघटनेचा 'जीवन गौरव पुरस्कार' मिळाल्यानिमित्त विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

**विशेष पुरस्कार व राज्यनाट्य स्पर्धा विजेते**

यावेळी शहरातील स्थानिक कलाकार आणि तंत्रज्ञांपैकी सुवर्णा काळे, रति देशमुख, संदीप उर्फ जम्माड देशमुख, संदीप उर्फ बबलू जगदाळे, सोमनाथ तरटे यांना विशेष पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. तसेच राज्यनाट्य स्पर्धा २०२४ मधील विजेते मनोहर जुवाटकर, कमलेश बिचे, विनायक परदेशी, अथर्व कुलकर्णी, श्रुती भोसले, दिनेश साबळे यांनाही मंचावर सन्मानित केले जाणार आहे.

या पत्रकार परिषदेस सुहास जोशी, राजेंद्र बंग, संतोष रासने, संतोष शिंदे, गौरी लोंढे, रूपाली पाथरे आदी मान्यवर उपस्थित होते. २३ ऑगस्टचा हा सोहळा म्हणजे पिंपरी-चिंचवडच्या नाट्यरसिकांसाठी सांस्कृतिक पर्वणीच ठरणार आहे.

# गणेश मंडळांसाठी महावितरणची 'एक खिडकी सुविधा'



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांना तात्पुरती व त्वरित वीजजोडणी मिळावी यासाठी महावितरणकडून रास्तापेठ येथील कार्यालयात विशेष 'एक खिडकी सुविधा' उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व मंडळांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी केले आहे.

गणेश मंडळांना तात्पुरती वीजजोडणी मिळवण्यासाठी महापालिका/स्थानिक स्वराज्य संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, पोलिस परवानगी, वीज मागणी अर्ज तसेच वीजसंच मांडणी अहवाल ही कागदपत्रे आवश्यक राहणार आहेत. पुण्यातील सर्व मंडळांचे अर्ज रास्तापेठ पावर हाऊस येथील मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्रामध्ये स्वीकारले जातील. याकरिता अतिरिक्त कार्यकारी अभियंता अविनाश लोखंडे (मो. ७८७५७६७४९४) यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

गणेशोत्सव काळात कोणत्याही प्रकारचा वीज अपघात होऊ नये यासाठी मंडप, रोषणाई व देखावे उभारताना लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिन्या, वितरण रोहित्रे आदी यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखणे बंधनकारक आहे. तसेच मंडपातील वीजसंच मांडणी करताना विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करणे, मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडूनच काम करून घेणे आणि विद्युत सुरक्षेत तडजोड न करणे आवश्यक आहे. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीसाठी स्थानिक शाखा अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक जवळ ठेवावेत, असेही सूचित करण्यात आले आहे.

तात्पुरत्या जोडणीसाठी मंडळांना मंजूर वीजभारानुसार अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. ही रक्कम ऑनलाईन भरल्यास, उत्सव संपल्यानंतर वीजबिलाची रक्कम वजा करून उरलेली रक्कम त्वरित परत करण्यात येणार आहे. त्यामुळे गणेश मंडळांनी अनामत रक्कम ऑनलाईनच भरण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.